स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**रासेयो/२०२३–२४/००३** **दि. ०६/०४/२०२३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : औपचारिक शिक्षण किंवा नियमित नोकरीत नसलेल्या युवकांचे सर्वेक्षण उपक्रमाच्या जिल्हानिहाय प्रशिक्षण कार्यशाळेकरिता उपस्थित राहणेबाबत**

**महोदय/महोदया,**

युवा व खेल मंत्रालय कार्यालय, नवी दिल्ली आणि मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचलनालय, भारत सरकार यांनी पाठवलेल्या पत्रान्वये शिक्षण व नियमित नियुक्ती नसलेल्या युवकांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आलेले आहे. सदर युवकांचे सर्वेक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या माध्यमातून दत्तक गावांमध्ये नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर उपक्रमांच्या दरम्यान करण्यात येणार आहे. यामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचलनालय, भारत सरकार यांच्यामार्फत सर्वेक्षण अर्जांचे वाटप करून, रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत सर्वेक्षण झाल्यानंतर सदर सर्वेक्षण अर्ज एकत्रीत स्वरूपात स्विकारून पुन्हा मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचलनालय कार्यालयास देण्यात येणार आहे.

सदर औपचारिक शिक्षण किंवा नियमित नोकरीत नसलेल्या युवकांच्या सर्वेक्षण उपक्रमाची प्रशिक्षण कार्यशाळा पुढील तपशिलानुसार जिल्हानिहाय पद्धतीने पुणे, अहमदनगर व नाशिक येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

| महाविद्यालय/विभागाचे नाव | विभाग | दिनांक व वेळ | तपशील |
|---|---|---|---|
| पर्यावरणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | पुणे शहर, पुणे ग्रामीण (पुणे जिल्हा) | ११ एप्रिल, २०२३ सकाळी ११.०० वा. | रासेयो कार्यालय, ०२०–२५६२२६८८,८९,९०,९१ |
| न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर | अहमदनगर जिल्हा | १२ एप्रिल, २०२३ सकाळी १०.०० वा. | प्रा. गणेश निमसे, कार्यक्रम अधिकारी, संपर्कः ९४०४२८१८२८ |
| मराठा विद्या प्रसारक समाज कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक | नाशिक जिल्हा | १३ एप्रिल, २०२३ सकाळी १०.०० वाजता | डॉ. रविंद्र आहिरे, जिल्हा समन्वयक, रासेयो, नाशिक संपर्कः ९७६५२१९४२२ |

तरी आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना वरील तपशिलानुसार औपचारिक शिक्षण किंवा नियमित नोकरीत नसलेल्या युवकांच्या सर्वेक्षण उपक्रमाच्या जिल्हानिहाय प्रशिक्षण कार्यशाळेकरिता अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व सदर कालावधीमध्ये त्यांची कर्तव्य रजा मंजूर करण्यात यावी. सहभागी कार्यक्रम अधिकारी यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**